# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि,वाशिम.

दि.०९/०७/२०२५

आरोपी दिलीप पंढरी नंदापुरे,वय ३४ वर्ष,व्यवसाय कंत्राटी कामगार बाहयवर्ग <u>लाईनमन/तंत्रज्ञ,ग्रामिण</u> पश्चिम,उपविभाग वाशिम एम.एस.ई.बी कार्यालय वाशिम.रा.वाळकी ता.जि.वाशिमयांना लाच स्विकारले प्रकरणातताब्यात घेउन गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | दिलीप पंढरी नंदापुरे,वय ३४ वर्ष,व्यवसाय कंत्राटी कामगार बाहयवर्ग <u>लाईनमन/तंत्रज्ञ,ग्रामिण</u> पश्चिम,उपविभाग वाशिम एम.एस.ई.बी कार्यालय वाशिम.रा.वाळकी ता.जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | ५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तकारदार यांचे वडीलांच्या नावावरमागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गतसौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण केल्याचा मोबदला म्हणुन ५०० रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | ए.एम.गायकवाड, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.०८/०७/२०२५ रोजी तकारदार पुरुष वय ३३ वर्षयांनी तकार दिली की,तकारदार यांचे वडीलांच्या नावावरमागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गतसौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण केल्याचा मोबदला म्हणुन आरोपी कंत्राटी लाईनमन नंदापुरे हे १०००/- रुपये लाचेची मागणीकरत आहेत.

दि.०८/०७/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तकारदार यांना ७००/- रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ५००/- रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.०९/०७/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी कंत्राटी लाईनमन नंदापुर यांनी ५००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आरोपी कडुन लाच रक्कम ५००/-रुपये हस्तगत केली. आरोपी विरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, ला.प्र.वि. अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यविक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदीश परदेशी ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक ए.एम.गायकवाडयांचे पथकातील कर्मचारी पोहवा नितीन टवलारकर, विनोद मारकंडे, राहुल व्यवहारे,योगेश खोटे यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी कमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल कमांक -८४४६८७८९०३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन ए.एम.गायकवाड पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

A.M.Gaikwad

(ए.एम.गायकवाड)

**पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.**